
एडमंड गेला खूप दूर



एडमंड गेला खूप दूर





मराठी : अश्विनी बर्वे

एडमंडचे घर

एडमंड एका फार्ममध्ये राहत होता. डांबरीरोडने सुरु होवून एक कच्चा रस्ता फॉर्मच्या समोरून जात, शेताच्या मधून निघून पहाडाच्या खाली निघत होता. घरातून निघून जर कोणी उजव्या बाजूने गेलं तर तो तलावावर पोहचत असे. तलावात तीन पांढऱ्या रंगाची बदके होती. जेव्हा एडमंड तलावावर आला, तेव्हा सगळं सोडून बदके एडमंडच्या जवळ आली. कधी कधी एडमंड खाण्यासाठी त्यांना ब्रेडचे तुकडे देत असे. एडमंडची बदकाबरोबर मैत्री होती.









घराच्या अगदी समोर गुरांचा गोठा होता.त्याच्याजवळच डुक्करासाठी सुद्धा गोठा होता. डूक्करांच्या गोठ्यात एक खूप मोठी-डुक्करीण राहत होती. नेहमी तिच्याजवळ १०-१२ छोटी पिल्लं असत. आता तिच्याजवळ एकही पिल्लू नव्हतं. पण ती खूप जाड होती. ती जमिनीवर झोपलेली होती आणि जेव्हा ऐडमंड तिच्याजवळ गेला, तेव्हा ती उभी राहिली नाही. तिने फक्त आपले डोळे उघडले, त्याच्याकडे बघितलं आणि गुरगुरली.


गोठ्यात वाळलेल्या पेंढ्या मध्ये वासरं होती. अधिकतर वासरं काळे आणि पांढऱ्या रंगाचे होते, पण काही भुऱ्या रंगाचे होते. अजूनपर्यंत वासरांचा आवाज निघाला नव्हता. पण आपले मोठ-मोठे डोळे पूर्ण उघडून ते एडमंडकडे बघत असत.



जवळच्या मैदानात गायी होत्या. ज्या रोज संध्याकाळी गोठ्यात दूध देण्यासाठी येत आणि रात्री परत मैदानावर जात. तसं पाहिलं तर गायींना तो काही म्हणाला नाही पण एडमंडला वाटे की रात्री त्यांना थंडी वाजत असेल. मोठा, म्हातारा, भुऱ्या रंगाचा घोडा नॅडपण त्याच फार्मवर राहत होता. आता त्याला काम होत नव्हते आणि तो नेहमी बाहेरही जात नसे. एडमंडने नॅडला खाण्यासाठी साखर दिली.

त्याच्या घराच्या जवळ आणि गोठ्याच्या मध्ये कोंबड्या राहत होत्या - भुऱ्या रंगाच्या. एक मोठा कोंबडा जो एडमंडला खूप आवडे.परंतु जेव्हा एडमंड त्याच्याजवळ येई तेव्हा तो बांग देत दूर निघून जाई. जेव्हा कोंबडा उतारावरून खाली येई, तेव्हा काही कोंबड्या त्याच्या मागे जात. जर एडमंडला कोंबडा दिसला तर तो त्याचा पाठलाग करून त्याला परत फार्ममध्ये घेवून येई.









पहाडाच्या उतारावर पायथ्याशी विशाल, उंच झाडांचे उपवन होते. त्या उपवनात जास्तीत जास्त झाडं ‘बीच’ चे होते. उन्हाळ्यात त्या झाडांखाली गार वाटायचं. झाडांवर कावळे राहत होते. झाडांच्या फांद्यांवर त्यांनी मोठ-मोठी घरटी बांधली होती. जेव्हा कावळे एडमंड ला येतांना बघत तेव्हा ते उडून आपल्या घरट्यातून बाहेर येत. ते त्याच्याजवळ येत नसत पण ते उत्साहाने ओरडत. गाडीने केलेला प्रवास सोडला तर (ज्याची गणती अधिक नव्हती.) उपवन त्याच्या घरापासून सगळ्यात दूर होते जिथं एडमंड कधीतरी जात असे.

एडमंड गेला.

एका दुपारी एडमंड घरातून बाहेर निघाला आणि त्याने स्वतःलाच एवढ्या मोठ्या आवाजात सांगितले त्यामुळे ज्याला कोणाला तो काय म्हणाला हे ऐकायचं होतं, तो ऐकू शकला असता- “मी खूप दूर जात आहे” त्याचे सॅन्डल नीट बांधले गेले आहे की नाही हे बघण्यासाठी त्याने जमिनीवर पाय झटकले. त्याच्या बाह्या नीट फिरत आहेत की नाही हे बघण्यासाठी त्याने बाह्या हलवल्या.खूप दूर चालण्यासाठी त्याचे पाय चांगले आहेत की नाही हे बघण्यासाठी त्याने वर-खाली उड्या मारून बघितल्या. आणि दोन्ही पायांना झटका मारला. मग तो चालू लागला.

सगळ्यात आधी तो बदकांजवळ गेला. बदकं पोहत त्याच्याजवळ आली. “बदकांनो,” एडमंड म्हणाला, “मी दूर जात आहे, खूप दूर.”

“क्वॅक,” बदक म्हणाले, क्वॅक-दूर.”





मग एडमंड डुक्कराकडे गोठ्यात गेला आणि जाडजूड डुकरीणीला म्हणाला, “मी दूर जात आहे, खूप दूर”.

“ओइंक,” डुकराने आवाज काढला, “ओइंक-दूर.”


मग एडमंड पिल्लांजवळ गेला आणि त्यांना सांगितलं, “मी दूर जात आहे, खूप दूर.”

पण पिल्लं काहीच म्हणाले नाहीत. त्यांनी फक्त आपले एवढे मोठे डोळे उघडले की एवढे मोठे डोळे त्यांनी कधी उघडलेच नव्हते आणि ते एडमंडकडे बघू लागले.

मग एडमंड गाईच्या गोठ्याच्या फाटकाजवळ गेला आणि त्यांना म्हणाला, “मी दूर जात आहे, खूप दूर.”

“हम्मा,हम्मा,-दूर” गायी म्हणाल्या. म्हातारा घोडा नॅड पण गायींसारखे परत म्हणाला, खी-खी –दूर”






मग एडमंड त्या रस्त्याने निघाला जो उपवनाकडे जात होता. दोन-तीन कोंबड्या झाडांतून बाहेर आल्या. एडमंड एका क्षणासाठी थांबला आणि त्याने त्या कोंबड्यांना घराकडे हाकललं.


"चक-दूर, चक-दूर, चक-दूर," कोंबड्या घरी जातांना म्हणाल्या. एडमंड डोंगराच्या उतारावरून पुढे निघाला. त्याला खात्री होती जेव्हा तो उपवनात जाईल तेव्हा त्याचे मित्र कावळे त्याच्याशी बोलतील. त्यांनी त्याला निराश केले नाही. त्यांनी त्याला येतांना पाहिलं होतं. तो झाडांच्या खाली पोहचत नाही तोच आपल्या घरट्यामधून घोळक्याने ते त्याच्याकडे ओरडत आले, "काव, काव, काव"

एडमंडने डोकं वर करून ओरडून कावळ्यांना सांगितलं, "मी दूर जात आहे, खूप दूर."

कावळ्यांनी त्याचं म्हणणं ऐकलं आणि त्याला उत्तर दिलं, "काव, काव, काव-दूर, काव-दूर." पंख फडफडावत ते त्याच्या डोक्यावरून फिरत राहिले, आणि मग एक-एक करत झाडांच्या मध्ये असणाऱ्या त्यांच्या घरट्यात परत गेले.







एडमंडला उपवनातून जाण्याची काही घाई नव्हती. तो झाडांच्या जवळ फिरत राहिला आणि काही झाडांना थोपटत राहिला. "बीच"च्या झाडाचे साल सुंदर व मुलायम होती.तो एका छोट्या झाडाजवळ उभा होता आणि त्याने आपल्या दोन्ही हातांनी झाडाला मिठी मारण्याचा प्रयत्न केला.त्याचे हात कसेबसे एकमेकांना स्पर्श करू शकले. मग तिथून निघण्याची वेळ झाली.

"अच्छा," त्याने हळूवारपणे झाडांना सांगितले.

"श्श्श, श्श्श," झाड म्हणाले, "श्श्श-दूर."

उपवनाच्या पुढे रस्ता थोड्या दूरपर्यंत खालच्या बाजूला जात होता.खाली दलदल होती आणि रस्त्यावर दाट गवत उगवले होते. ज्याच्यावरून ट्रक्टर गेला होता, त्याच्या चाकाच्या खुणा तिथं होत्या. एडमंड कडेकडेने चालत राहिला आणि आपले पाय ओले न करता त्याने दलदल पार केली. मग तो पहाड चढू लागला आणि त्याच्या टोकाकडे जावू लागला. त्याने पहाडाचे टोक कितीवेळा तरी पाहिले होते. पण तो त्यावर कधी चढला नव्हता. पण लवकरच त्याने ते गाठले. लवकरच तो खूप दूर आला.



लांबचा प्रवास


पहाडावर जाणारा रस्ता, जो एडमंडने आपल्या बेडरूमच्या खिडकीमधून अनेक वेळा बघितला होता, त्याला तो लांब वाटत नव्हता.पण रस्ता संपतच नव्हता, संपतच नव्हता. पहाडावर चढतांना एडमंडला वाटले की जर कोणी त्याच्या बरोबर असते तर. मग त्याने विचार केला की जर त्याचे फार्म मधले मित्र त्याच्या बरोबर आहेत आणि त्यांची एक लांबची लांब रांग तो पहाडावर घेवून जात आहे.

त्याने विकॅह्र केला एक म्हातारा घोडा-नॅड, त्याच्या अगदी मागे असायला हवा म्हणजे तो दमला तर त्याच्यावर बसेल. घोड्याच्या मागे खूप सारे कावळे हवेत, कावळे खूप आवाज करतील. पण जेव्हा तो खूप दूर, खूप दूर जाईल तेव्हा जमिनीची तपासणी करण्यासाठी कावळ्यांना पाठवेल. त्याने विचार केला गायी सुद्धा उपयोगी आहेत, कारण त्याला तहान लागली तर तो त्यांचं दूध पिवू शकेल. आणि गायींच्या पाठीवर काही कोंबड्या बसल्या तर त्यांच्यातली एखादी कोंबडी अंडं देवू शकेल.

.







वासरं त्याला दूध देवू शकणार नाही पण जेव्हा तो पहाडावर पोहचेल तेव्हा ते त्याच्यासाठी पहारेकरी होतील. त्या चार वासरांना चारी दिशांना तोंड करून तो उभे करून देईल. आणि ते त्याला सांगतील त्याच्याकडे कोण येत आहे. त्याला समजत नव्हतं डुकरीण काय काम करेल? पण तिला इच्छा असेल तर ती ही त्याच्या बरोबर येईल.

तीन बदकं बरोबर असतील तर चांगलं होईल कारण ते खूप आरडाओरडा करतात. सुरुवातीला एडमंड त्यांचा आवाज ऐकून घाबरून जायचा. पण जर त्याची भेट त्याला न आवडणाऱ्या माणसाची झाली, तर तो बदकांना त्यांच्यावर ओरडायला सांगू शकतो. एडमंडने स्वतः कितीवेळा बदकांचा आवाज काढला-याचा अर्थ असा नाही की तिथं कोणी त्यावेळी हजर होतं. पण आपला आवाज ऐकून त्याला आनंद झाला. त्याला वाटले त्याचे सगळे मित्र अगदी त्याच्या मागे आहेत.



एडमंडला वाटलं की घरी त्याचे जे मित्र होते त्यांना मदतीसाठी घेवून येवू शकला असता. जर कोणी शत्रू आले तर त्याला लाल कोट घातलेल्या दहा शिपायांनी मदत केली असती. जर म्हातारा नॅड थकला आणि त्याला आराम करावा वाटला तर त्याच्या डोलणाऱ्या घोड्याचा उपयोग होवू शकला असता. आणि त्याचा काळा-पांढरा पांडा, जो त्याच्या अंथरुणात झोपत असे, तो ही एडमंड बरोबर असायला हवा होता.

एडमंड पुढे चालत राहिला, चालत राहिला. तो सारखा पहाडावर चढत राहिला आणि अचानक त्याला वाटलं की तो टोकाच्या अगदी जवळ आहे. त्याचे कल्पनेतले मित्र, जे त्याच्या मागे होते, गायब झाले. तिथं एडमंड अगदी एकटा होता आणि तो खूप दूर जात होता. आनंदात त्याने आपले हात वर केले आणि पहाडाच्या टोकाकडे धावत निघाला.





एडमंडने पहाडावरून खाली नवीन प्रदेश बघितला ज्यावर तो त्याचा अधिकार सांगू शकला असता. त्याच्या डाव्या बाजूला गव्हाचे पिवळे शेत पसरलेले होते, ज्याचे पीक काढायला आले होते. त्याच्या उजव्या बाजूला झाडांच्या कुशीत एक गाव होते आणि गावातल्या चर्चचे उंच मिनार त्याला दिसत होते. त्या पलीकडे जमीन परत वरच्या बाजूला जातांना दिसत होती. आणि तिथल्या पहाडावर काहीतरी होतं जे एखाद्या गडासारखे दिसत होते. सगळ्यात सुंदर एक तळे होते मजे त्याच्यासमोर खाली होते. ते खूप दूर नव्हते.

तळ्याच्या एका बाजूला पानवनस्पती वाढली होती आणि त्याच्या पलीकडे झाडं होती. दुसऱ्या बाजूला तळ्याचा किनाऱ्याला खूप उतार होता आणि तिथं एक होडी बांधलेली होती.तळ्यात एक एकटा हंस होता जो गोल-गोल पोहत होता. पानवनस्पतीमध्ये हिरव्या आणि भुऱ्या रंगाची बदकं पोहत होती आणि चिखलात आपली चोच घालून खोदत होते.

हा सगळा एडमंडचा देश होता. तो त्याला जवळ घेवू इच्छित होता. त्याने खूप लांब चालून त्याचा शोध घेतला होता.




घरापासून एक रात्र दूर

आपण शोधलेला नवीन देश बघून एडमंड एवढा उत्साहित झाला होता की तो पळत पहाडावरून पळत खाली आला. खाली येवून त्याला कळलं की, तिथून तो उपवन, शेत, गायींचा गोठा, वा फार्म वरचे आपले घर तो पाहू शकत नव्हता. तो पटपट पळत पहाडाच्या टोकावर आला आणि ज्या रस्त्याने तो आला होता तो रस्ता तो बघू लागला.

जिथं त्याचं घर होतं: त्याच्या बेडरूमची खिडकी त्याला दिसली आणि वाऱ्याने हळूहळू हलणारा पिवळा पडदा दिसला. मग त्याची नजर कशावर तरी पडली, एक ओळखू येणारी आकृती पहाडावर त्याच्याकडे येत होती. ते त्याचे वडील होते.






एडमंडने आपल्या वडिलांकडे बघितलं आणि दचकत आपला हात हलवला.मग तो नव्या दुनियेकडे वळला आणि पुढे चालू लागला. तो त्या रस्त्याने चालू लागला जो खाली तळ्यात उगवलेल्या पानवनस्पतीकडे जात होता. जमीन दलदली होती पण मध्ये-मध्ये काही अशा जागा होत्या जिथं तो सहज उभा राहू शकत होता. एडमंडने ती वनस्पती उखडू बघली, पण ती जमिनीला घट्ट धरून होती. पण शेवटी त्याने एक लांबलचक वनस्पती तोडली आणि तिला तलवारी सारखं धरत तो तळ्याच्या काठा काठाने होडीकडे निघाला.


एडमंडने बघितले की होडी जिथं बांधली होती तिथं किनाऱ्यावर लाकडाच्या मचाणासारखे काहीतरी बांधलेले होते. त्यावरून चालत तळ्याच्या किनाऱ्यापर्यंत पोहचू शकत होतो.त्या मचाणावर झोपून तो खाली वाकू शकत होता आणि पाण्याला स्पर्श करू शकत होता. होडीला हलवण्यासाठी तो पाण्याला हलवत तो तरंग तयार करू लागला.






एडमंड उभा राहिला. ज्या दोरीने होडी बांधली होती, ती ओढली आणि जेव्हा होडी जवळ आली तेव्हा त्यात उडी मारून तो बसला. होडीत वल्हव होते, तो त्यांना उचलू शकत होता, पण ते एवढे मोठे होते की त्यांचा तो उपयोग करू शकत नव्हता.

जेव्हा शेवटी त्याचे वडील त्याच्याजवळ पोहचले तेव्हा तो होडी चालवत तळ्याच्या मधोमध आला. कारण एडमंड हसून बोलू इच्छित होता. पण त्याने हसून नम्रतापूर्वक आपली मान दोन वेळा खाली झुकवली आणि तरंगत दूर गेला.







त्यांनी होडी परत बांधून टाकली.एडमंड तळ्याच्या काठा–काठाने चालू लागला. तळ्याच्या काठी पडलेली लाकडं तो गोळा करू लागला. त्याच्या वडिलांच्या पिशवीत एक कढई आणि सॉसेज होते.त्यांनी चूल पेटवली आणि त्यावर सॉसेज आणि बीन्स भाजून त्या दोघांनी ते खाल्लं. आतापर्यंत खूप अंधार झाला होता आणि चंद्र उगवला होता. वडिलांनी स्लीपिंग बॅग आणल्याचे बघून एडमंडला प्रसन्न वाटलं. कारण त्यांनी जी शेकोटी पेटवली होती ती तळ्याच्या पलीकडे पहाडाच्या वर होती. एडमंड खालच्या बाजूला झोपू शकत होता आणि तळ्याकडे बघू शकत होता.


पाण्याच्या वर अंधुकसे ढग जमले होते.एडमंडला वाटलं की अंधुक ढग हे प्रेतांसारखे दिसतात. पण त्यातील काही मित्रांसारखे होते कारण ते तळ्यातून बाहेर येत होते. जसजसे ढग मोठे होवू लागले, तसे त्याला वाटले की त्यांचे चेहरे त्याला जे लोक आवडत होते त्यांच्यासारखे दिसतात. त्याच्या त्या मित्रांसारखे जे तो खूप दूर आल्यामुळे मागे घरी राहिले होते.


एडमंड घरी परत आला

सकाळी जेव्हा सूर्याची किरणं एडमंडच्या डोळ्यावर चमकू लागली तेव्हा तो जागा झाला. मंद-मंद वारा तळ्यावर पसरलेलं धुक्याला बाजूला सारत होता. हंस उठला आणि तळ्यात गोल-गोल फिरत होता. एडमंडचे वडील कांबळे पांघरून दगडाला पाठ टेकून बसले होते. एडमंडला वाटलं ते कदाचित झोपले असतील पण जसा तो हलला तसे त्याच्या वडिलांनी डोळे उघडले आणि हसले.

एडमंड आपल्या स्लीपिंग बॅगच्या बाहेर आला. त्याने आपले सॅन्डल घातले आणि आजूबाजूला बघू लागला. बदकं पानवेलीवर होती, पण हंस पाण्याच्या थोडा बाहेर आला, त्याने आपले पंख फडकावले, जसे की तो उडून जाणार होता. पण तो परत पाण्यात पोहू लागला आणि एडमंड कडे जावू लागला आणि मान झुकवून अच्छा करू लागला. एडमंडने पाहिले की तळ्याजवळच्या झाडांवर कावळे होते. पुढच्या वेळी तो त्यांच्याकडे जाईन आणि गप्पा मारेन.







एडमंडचे वडील सुस्तावले होते. त्याने कढई पिशवीत ठेवली आणि स्लीपिंग बॅगसुद्धा त्यात कोंबली. त्याने पहाडाच्या टोकाकडे हात दाखवला आणि वडिलांनी मान हलवून होकार दिला. ते हसले पण बोलले काहीच नाही. एडमंडने फिरून हंसाचा निरोप घेतला. पानवेली वरच्या बदकांचा पण निरोप घेतला. मग त्याने वडिलांकडे बघून हात हलवला आणि पहाड चढू लागला.

एडमंड विचार करत होता, जेव्हा तो पहाडाच्या टोकावर पोहचेल तेव्हा त्याचं घर तसंच दिसेल का? जसं काल दिसलं होतं. कदाचित रात्रीतून सगळं काही बदललं असेल. फार्म, जनावरांचा गोठा, उपवन, कावळे, वासरं, गायी, डुकरीण, घोडा, आणि एवढंच नाही तर बदकं सुद्धा –सगळे गायब झाले आहेत. त्या जागी एक मोठं नगर वसलं आहे, जिथं क़ॉक़ीटची मोठ-मोठी इमारते आहेत. पहाडाच्या टोकावर जायला एडमंड उत्सुक होता.


त्याने डोळे बंद केले आणि शेवटचे तीन-चार पाउलं तो हळू हळू गेला. जेव्हा त्याला वाटलं की तो पहाडावर पोहचला आहे तेव्हा त्याने कितीतरी वेळा दीर्घ श्वास घेतला आणि आपले डोळे उघडले.सगळं काही जसच्या तसं होतं. फार्म तसंच होतं.आत्ता त्याच्या बेडरूमची खिडकी बंद होती आणि पिवळा पडदा उडत नव्हता. जनावरांचा गोठा भक्कम होता. घराच्या जवळ शेतात गायी होत्या आणि नॅड होता. नॅड पण तसाच होता, तो फार दूर गेला नव्हता.


एडमंड उपवनाकडे पळत गेला. तो दूर गेल्यानंतर झाडाची पानं अधिक हिरवी आणि चमकदार झाली होती. तो पटकन झाडांच्या मध्ये आला आणि सगळ्यात छोट्या झाडाकडे पळत गेला. झाड काल पेक्षा अधिक छोटं वाटत होतं. तो सहजतेने झाडाला मिठी मारू शकत होता.आणि कावळे कुठे गेले? एडमंडला समजलं की त्यांनी त्याला दुसऱ्या दिशेने येतांना बघितलं नव्हतं. तो पळत उपवनाच्या बाहेर आला आणि ओरडला, “काव कांव, मी इथं आहे!” जेव्हा कावळ्यांनी त्याचा आवाज ऐकला तेव्हा ते घरट्यातून बाहेर आले आणि उडत खाली त्याच्याजवळ आले. “कांव!” एडमंडने ओरडून म्हटलं. “मी खूप दूर गेलो होतो.”

“कांव-दूर!” ते ओरडले.

जेव्हा एडमंड वर फार्मकडे जात होता,कावळे समुहाने कांव कांव करत त्याच्या मागे आले. त्यांच्या आवाजामुळे कोंबड्या उत्तेजित झाल्या आणि त्या पळत त्याला भेटायला आल्या. “चक-दूर,चक-दूर” त्या आवाज करत होत्या. एडमंडकडे आपलं डोकं उचलत मोठा कोंबडाही तिथं आला. त्याने जोरात बांग दिली. काय खरंच एडमंड परत आला?







गायी शेताच्या काठाला एकत्र जमल्या आणि एडमंडला अभिवादन करू लागल्या. "हम्मा-दूर, हम्मा-दूर". नॅड फाटकावर वाकला आणि त्याने प्रसन्नतेने आपली मान सरळ केली आणि डोकं उजव्या-डाव्या बाजूला हलवू लागला. नेहमीसारखे वासरं काहीच म्हणाले नाही. पण ते गोठ्याच्या समोर एका रांगेत उभे राहिले आणि त्याच्याकडे एकटक बघू लागले.आणि डुकरीण? आता ती एकटी नव्हती. तिच्याजवळ कमीत कमी बारा पिल्लं होती. ती खरंच उभी राहिली आणि एडमंड वर गुरगुरण्यासाठी पुढे आली. तिची पिल्लं केकटत तिच्या मागे आले आणि एक अनोळखी बघून घाबरले. एडमंडने थांबून त्यांना मोजू बघितलं पण ते इतके जोरात इकडे-तिकडे पळाले की त्यांना मोजण अशक्य झालं. बदकं तळ्यात होती आणि ती पटकन त्याच्याकडे आली.

"मी दूर गेलो होतो, खूप दूर," एडमंडने बदकांना सांगितलं.

"क्वॅक-दूर," ते परत त्याच्याकडे बघून ओरडले. त्याला अभिवादन करण्यासाठी काही बदकं पाण्यातून बाहेर आले.

मग एका क्षणासाठी तो प्रवेशद्वाराच्या जवळच्या चबुतऱ्याजवळ आला-आधी त्याने आपल्या मित्रांकडे बघितलं. मग पहाडाकडे, त्याला माहित होतं त्या पहाडाच्या मागे एक वेगळा देश आहे. तो कदाचित अजून तिथंच होता. लवकरच तो परत तो देश बघायला जाईल. "मी खूप दूर गेलो होतो" घरात जातांना मागे वळत तो मोठ्याने म्हणाला, "मी खूप दूर गेलो होतो आणि आता मी परत आलो आहे."

समाप्त